www.oshmedical.com

Established in 2007

SUNDER
Educational Consultants

DIRECTOR's Message

Dr. DIPESH VISHNU RASAL
(MBBS, DMRE)

Dear Students,

It gives me immense pleasure to unleash before you the opportunities of MBBS in abroad.

Abroad medical education is miles ahead when we talk of medical education. The high technology of medicine, updated methodology, skill fulled practical makes you perfect in each aspects. I am sure you will be enthralled by the standards of each university, its latest curriculum, comprehensive teaching systems, the care and approach of the professors and their staff compiled with the blissful ambience that will enrich your mind studying there.

Moreover you will enjoy the environment that you might have never witnessed before, the cosmopolitan culture, trends, cuisines and the social life.

To ease it all we at **SEC (Sunder Educational Consultant)** strive to make this experience of securing admission for you in the best University all the more memorable and splendorous. It is my sheer privilege to admit that we have been successful in boarding hundreds of students of Medical courses to Abroad alone. With you at each step, from getting admission to your final pass out, we will ensure that the coming years spell success for you with a lasting lifetime experience.

My best wishes remain with you for your future quest, exploration and enlightening career in MBBS.

नमस्कार,

मी डॉक्टर दिपेश विष्णू रसाळ. आज मी तुमच्याशी अगदी निखळ संवाद साधणार आहे. तुम्हाला तर माहितच आहे की मी ही डॉक्टरकी भारतातून नव्हे तर रशियातून मिळविली आहे. आज मी जरी हे अगदी सहज सांगत असलो तरी मला प्रत्यक्ष परदेशी जाऊन शिकतांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले. आजच्या तुलनेत त्यावेळी तेथे जाऊन शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अगदीच नगण्य होते. त्यामुळे मला व माझ्या सारख्या विद्यार्थ्यांना बराच त्रास सहन करावा लागला. इतर विद्यार्थ्यांप्रमाणे मीही शिक्षण पूर्ण करून फक्त आपला व्यवसाय इमाने इतबारे करू शकलो असतो. मात्र शिक्षण पूर्ण करताना आलेल्या अडचणी आणि झालेला त्रास दूर करता येऊ शकतो याची मला खात्री पटली आणि त्याच क्षणी मनात **"सुंदर एज्युकेशन कन्सल्टंट"** ची स्थापना झाली असे म्हणावयास हरकत नाही.

सन्माननीय पालक व विद्यार्थी मित्रहो माझी कौटुंबिक पार्श्वभूमी तुम्हाला माहीत आहेच. त्यानुषंगानेच मी तुमच्याशी संवाद साधात आहे. मी रशियातील ओश स्टेट यूनिवर्सिटी मधून माझे MBBS चे शिक्षण पूर्ण केले व पोस्ट ग्रॅजुएशन Radiology मुंबई येथे पूर्ण केले आहे, त्यानंतर मी नाशिक येथे वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय , सामान्य रुग्णालय नाशिक म्हणजेच सिविल हॉस्पिटल येथे मेडिकल ऑफिसर म्हणून काम केले आहे. या कन्सल्टन्सी च्या माध्यमातून पैसे कमविणे हा माझा हेतू नाहीच. परंतु मला रशियासारख्या देशात जाऊन शिक्षण पूर्ण करताना ज्या अडचणींना तोंड द्यावे लागले ती वेळ आपल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर येऊ नये हीच प्रामाणिक इच्छा. मी माझ्या घरच्या परिस्थितीनुसार आज पर्यंत विचार करत आलो आहे व त्यामुळेच मला आपणासारख्या सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीची आणि तरीही मुलांना शिकवून मोठे करण्याची तळमळ याची पूर्ण जाणीव आहे. याच तळमळीला तुमच्याकडे असलेल्या आर्थिक क्षमतेच्या सहाय्याने समाधाना मध्ये रूपांतरित करण्याचा विडा मी उचलला आहे. SEC ची स्थापना 2006 मध्ये झाली आणि या माध्यमातून आजपर्यंत शेकडो डॉक्टर घडविण्याची बहुमूल्य संधी आपणासारख्या पालकांनी मला दिली. 2006 साली जर कोणी मला प्रश्न केला की, डॉक्टर आतापर्यंत आपल्या मदतीने किती डॉक्टर शिक्षण पूर्ण करून आले? तर मला उत्तर देताना संकोच वाटायचा. मात्र आता मी त्यांनाच विचारतो. तुम्ही कोणत्या गावी किंवा परिसरात राहतात ते सांगा. मी तुम्हाला तुमच्या जवळच शिकून आलेला डॉक्टरचे नाव सांगतो. म्हणजेच माझी ही चळवळ आता दिल्लीपासून थेट गल्लीत आली असेच म्हणावे लागेल. मी हे सर्व ज्या आत्मविश्वासावर करतो तो तुम्ही मला देत आला आहात आणि हा आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यासाठी तुमचा भ्रम निरास होऊ न देणे हे माझे कर्तव्य आहे. प्रत्येक पालक आपल्या पाल्याला अगदी जीवापलीकडे जपत असतो. अशावेळी सगळ्यांच्या मनात एक भीती निर्माण होते, मुलं जरी एमबीबीएस डॉक्टर होणार तरी त्याला आपल्या देशापासून चार हजार किलोमीटर दूर शिक्षणासाठी पाठवायचं का? वेगळा देश, वेगळी भाषा, वेगळे वातावरण, एक ना अनेक, शंकाच शंका. या शंका रास्त आहेत मात्र तुम्ही अजिबात चिंता करू नका या सर्व बाबींवर माझ्याकडे ठोस असे उत्तर आहे.

Dr. DIPESH VISHNU RASAL



ABOUT US

आता स्वप्न सत्यात उतरवण्याचीच तर वेळ आलीय. जे आवाक्याबाहेरचं असतं त्याला आवाक्यात आणण्यासाठी झटणारी संस्था म्हणजे सुंदर एजुकेशन. सुंदर एजुकेशनची स्थापना2006 मध्ये झाली आणि या माध्यमातून आजपर्यंत MBBS सामान्यांचा स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी सुंदर एजुकेशन गेल्या 15 वर्षापासून कार्यरत आहे आणि हळूहळू आमच्या प्रयत्नांना यश देखील येऊ लागलं. आम्ही सामान्यांच्या आशा आकांक्षा यांची जाणीव व त्यातून त्यांनी केलेला निर्धार आणि निर्धाराची फलश्रुती तुम्हाला वाचायला नक्कीच आवडेल. अहो वाचाच आणि आपल्या पाल्यांच्या स्वप्नांना वास्तविक आकार द्या. होऊन जाऊ द्या त्यांनाही डॉक्टर तेही MBBS.

"Sunder Educational Consultancy – Best consultant for MBBS admission in Maharastra"

SEC missions to bring medical education at the door step, giving access to high quality international teaching standards, updated academics and educational professionalism to the students in India at a reasonable cost and convenience.

SEC runs stringently by group of professionals who have a matured experience on education MBBS in abroad. SEC has to its credit of successfully boarding hundreds of students to Russia all of them are placed in the best of universities in Russia. SEC also works in close coordination with the authorities of leading Universities to promote and percolate the fineness and world class distinction of medical education, resources and talents.

Today SEC wields exclusive rights for admission to the Government Universities under the Ministry of public health, Russian Federation, Kyrgyz Republic and whose certification is recognized by Medical Council of India. SEC Proprietor Pri. V. R. Rasal. SEC tieup with WCI (world choice international) which works together in India and Abroad. To case admission for medical students.

Our host of representatives and staff are ready disseminating the right knowledge and experience to all the aspiring students to help take the right overseas decision, cater to their needs, select suitable courses and do the future planning in co-creating a bright and distinguishing career.

WHY CHOOSE SEC?

- Pioneers in education admission, exclusively in top medical colleges and universities of Russia.
- The founder members know the Abroad medical Education system genuinely at their finger tip.
- The only institute that conducts thorough academic assessment of the students organizes awareness seminars, provide timely admissions, provide visa guidance, induct pre departure orientation.
- SEC is accredited and credited as one of the top leading institute to recruit the maximum number of students in Russia.
- Co-operative and competent staff does all the proper counselling and processing, giving the entire perquisite support from the basic pre admission stage to graduation of the student .
- Keeps the parent and associates in loop of the student's progress and performance throughout his academic life.
- SEC acts as a common bridge between the students, parents and their university for all requirements.

ACHIEVEMENTS

नरहरी झिरवाळ

उपाध्यक्ष
महाराष्ट्र विधानसभा
विधान भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ |०७ |2020

शुभेच्छा पत्र

डॉ. दिपेश विष्णु रसाळ, आपण करोना काळामध्ये परदेशात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनसाठी आहोरात्र मेहनत घेवून लॉकडाउनच्या परस्थितीत विद्यार्थीना खाण्यापिण्याच्या वस्तू औषधे व इतर जिवनावश्यक वस्तू यांची कमतरता पडू दिली नाही. करोना संकटात मुलांसाठी देवदुतासारखी मदत केली व परदेशात अडकलेल्या विद्यार्थीना घरवापसीसाठी महाराष्ट्र सरकार व भारत सरकार यांच्याशी पत्र व्यवहार करून समन्वयक साधून विद्यार्थीना आपल्या देशात सुखरूप परत आणण्यासाठी **वंदे भारत मिशन** अंतर्गत प्रयत्न करून विद्यार्थीना कोविडची बाधा न होता परत आणण्यास मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल तुमचे खरच कौतुक करावे तेवढे कमीच आहे. आपणास पुढील कार्यास शुभेच्छा.

(नरहरी झिरवाळ)

कार्यालय : महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, तळ मजला, दालन क्र. ०१८/०१९, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी : ०२२-२२०२ ३६४६/ २२०२ ६४७० **ई-मेल :** dyspeakermh@gmail.com

परिस्थितीचा बाऊ न करता जिद्दीच्या जोरावर डॉक्टर

विशाल महालेची यशोगाथा, आईने दागिने विकून पुरविले पैसे

नाशिक : प्रतिनिधी

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या विशाल महाले याने आपल्या जिद्द आणि कष्टाच्या जोरावर डॉक्टर बनून यशाला गवसणी घातली आहे. आपल्या परिस्थितीचा बाऊ न करता जिद्द आणि प्रामाणिक कष्टाच्या जोरावर यशाला गवसणी घालत आईवडिलांचे स्वप्न पूर्ण केले.

वडील शेतकरी तर आई गृहिणी , एक बहिण आणि मुलगा विशाल महाले असे चौकोनी कुटुंब असलेल्या घरात आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने कर्ज काढून मुलाला डॉक्टर बनविले. आईवडिलांनी अगदी शुन्यातून सुरूवात केली. शेती सांभाळत उरलेल्या वेळात रिक्षा चालवून वडीलांनी कुटुंबाचा भार पेलला.आईवडिलांनी घेतलेल्या कष्टाचे चिज झाले. तसेच मार्गदर्शक दीपेश रसाळ यांच्या मार्गदर्शनामुळे रशियात जावू शकलो. त्यामुळे मी स्वत:ला भाग्यवान समजतो, असे डॉ.विशाल महाले यांनी दै.गांवकरीशी बोलतांना सांगितले.

मार्गदर्शक दीपेश रसाळ यांनी रशियाचा मार्ग दाखविला. ओ.एस.एच.स्टेट मेडिकल युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेशासाठी मदत केली. सहा वर्षे वेणाऱ्या अडचणी सोडविल्या. अपयश ही यशाची पहिली पायरी असते.तशीच परिस्थिती माझ्याही बाबतीत झाली. मात्र हे अपयश माझ्या आयुष्यातील दुसरी पायरी होती. त्यामुळे मी खचून गेलो होतो.अभ्यासक्रम अर्धवट टाकून परत यावे लागेल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती.परंतु चांगल्या गोष्टी आणि प्रामाणिक कष्ट पाठीशी असल्याने आईने तिचे दागिने विकून वडिलांनी शेतीवर कर्ज काढून बहिणीचे लग्न बाजूला ठेवून माझ्यासाठी आर्थिक प्रश्न मिटविले. त्यामुळेच आज मला हे यश चाखता आले.

ज्यावेळी मी एम.सी.आय. (मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडिया) या परीक्षेत डिसेंबरमध्ये १४५ मिळाले केवळ पाच मार्कांनी नापास झालो. त्यामुळे माझ्यासोबत घरच्यांनाही नैराश्य आले होते. मात्र मला अशा परिस्थितीत समजावणारेही तेच होते. यावेळीही रसाळ यांनी मला परीक्षेबाबत मार्गदर्शन, टिप्स दिल्या. त्यानंतर मी ठरविले की ही परीक्षा पास होवून घरच्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करावे. त्यानंतर मी माझे वेळापत्रक बनविले आणि तसेच फॉलो करण्याचा प्रयत्न केला.

दिवसातून सोळा ते सतरा तास सकाळी पाच ते रात्री दीड वाजेपर्यंत अभ्यास केला.माझ्यासमोर एम.सी.आय.ची परीक्षा आणि एक चांगला डॉक्टर बनून सेवा देण्याचे ठरविले. तसेच सहा महिने मी मित्र परिवार, सोशल मीडिया, नातेवाईक सर्व सोडून एकट्याने रुम घेऊन नियोजनबद्ध चिकाटीने अभ्यास केला. प्रयत्न करिता वाळूचे कण रगडिता तेलही गळे या उक्तीप्रमाणे कष्टाला यश मिळाले या परीक्षेत १७१ मार्कांनी पास झालो. माझ्या यशाचा आनंद माझ्या पेक्षा माझ्या आईवडिलांचे स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद आणि अभिमान जास्त आहे. यापुढे जावून मला भूलतज्ज्ञ म्हणून पी.जी करायची आहे, असे विशालने सांगितले.

आई-वडिलांनी अगदी शुन्यातून सुरुवात केली. माझ्यासाठी घेतलेल्या कष्टाचे चिज झाले. त्यामुळे मी स्वतःला भाग्यवान समजतो.

- डॉ. विशाल महाले

रशियातून एम.बी.बी.एस. डिग्री मिळाल्यानंतर भारतात ऑल इंडिया पातळीवर स्क्रिनिंग टेस्टमध्ये नाशिकचे डॉ.विशाल महाले यांनी यश प्राप्त केले. डॉ.विशाल महाले यांना प्रवेश घेतांना बऱ्याच आर्थिक अडचणी आल्या; परंतु त्यांचे प्रामाणिक प्रयत्न, जिद्द आणि माझे मार्गदर्शन हेच त्याच्या यशाचे गमक आहे. आजपर्यंत सर्वसाधारण कुटुंबातील हजारो हुशार विद्यार्थ्यांना एमबीबीएससाठी सुंदर एज्युकेशन कन्सल्टंटने प्रवेश मिळवून दिला आहे.

- डॉ.दीपेश रसाळ

(सुंदर एज्युकेशन कन्सल्टंट)

Crises & Evacuation in Pandemic

प्रशासनाला साकडे : रशियात अडकले २०३ विद्यार्थी; निफाडमधील २२ जणांचा समावेश

मायदेशी परतण्यासाठी 'त्या' विद्यार्थ्यांचे आर्जव

लोकमत न्यूज नेटवर्क

उच्च शिक्षणासाठी परदेशात असलेल्या विद्यार्थ्यांना मायदेशी परत आणण्याची पालकांची मागणी

राज्यमंत्री अब्दुल सत्तार, निफाडचे आमदार दिलीप बनकर, आ. प्रकाश आवडे, यांचे प्रयत्न

वनसगाव । प्रतिनिधी

रामभाऊ आवारे लक्ष महाराष्ट्र वनसगांव

EXCLUSIVE

जिल्हा-शहर

नाशिक, सोमवार, ३० मार्च २०२०

विद्यार्थ्यांना मायदेशी परत आणा

वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशी गेलेल्या २०३ विद्यार्थ्यांच्या पालकांची मागणी



रशियात अडकलेल्या विद्यार्थ्यांची घरवापसी

डॉ.रसाळ यांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील १६५२ विद्यार्थी परतले

नाशिक : प्रतिनिधी

रशिया व किर्गीस्तान येथे वैद्यकीय शिक्षण घेणारे नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर , सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्रातील १६५२ विद्यार्थी भारतात परतले आहेत.

सोमवारी दुपारी त्यांचे मुंबई येथे आगमन झाले. नाशिकचे डॉ. दीपेश रसाळ यांच्या प्रयत्नांमुळे सर्व विद्यार्थी मायदेशात सुखरूप पोहचले असून, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पालकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

रशिया व किर्गीस्तान येथील ओश स्टेट,स्लाव्हिक बिशकेक मेडिकल युनिव्हर्सिटी येथे हे विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेत होते. मात्र कोरोनामुळे लॉकडाऊन परिस्तिथी उद्भल्यामुळे ते गेल्या तीन महिन्यांपासून तेथेच अडकून पडले होते.

डॉ.दीपेश रसाळ यांनी परराष्ट्र मंत्री डॉ. सुब्रमण्यम जयशंकर यांना विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडून पत्र व्यवहार केला होता. वंदे भारत योजनेअंतर्गत याविद्यार्थांना मायदेशात परत आणण्यासाठी विनंती केली होती. त्यास परराष्ट्र मंत्रालया कडून व भारतीय दूतावासकून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. बिशकेक ते मुंबई व मॉस्को ते मुंबई आशा विमानाने सर्व विद्यार्थी भारतात सुखरूप परत आले. सर्व विद्यार्थना करून त्यांची कोरोना चाचणी केली आहे.

कोरोना लॉकडाउनच्या परिस्थितीत दीपेश रसाळ हे एकमेव गेल्या दोन महिन्यांपासून पाठपुरावा करीत होते. मुलांचा खाण्या-पिण्याच्या वस्तू, औषधे कुठल्याही प्रकारे कमतरता पडू दिली नाही. कोरोना संकटात मुलांना एखाद्या देवदूतासारखी मदत डॉ .रसाळ यांनी केली आहे. डॉ. दिपेश रसाळ सर सोडून महाराष्ट्रातील ईतर कोणीही कंसल्टंट प्रयत्न करतांना दिसले नाही. ही एक महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या मुलांनसाठी मोठी खेदाची बाब आहे.

मनोज पाटील, पालक

Successful Evacuation in Pandemic















5 YEARS COURSE

OSH STATE UNIVERSITY...

Medical institute OSH University today

Medical institute OSH State University is the largest educational institute in USSR. It has been training foreign students since 1992 and has trained foreign students form more then 20 countries. at present 8000 students are studding at medical institute including about 4000 students from countries like India, Pakistan, Nepal, Palestine, Syria, Turkey, Iran, Uzbekistan and other countries.

OSH State university is accredited and recognized by WHO (World Health Organization) World directory of medical school. OSH State university is also accredited and recognized by Medical Council of India (MCI/NMC). Medical graduated having degree of medical institute OSH State University are eligible to take screening test of medical council of India (MCI) and NEXT examination held in India.

Teachers are very experienced almost of them are either or medical science or candidate of medical science. many out standing scientist work in institute at present. The physician with OSH State University working in different countries of Asia, Africa, Europe and America. Institute has its own library with 61,378 Medical Books and International Scientific Magazines.

Number of Teachers : 2758

Doctor of Medical Sciences PhD : 326

Postgraduates and Specialist Teachers : 516

48 Hospitals attached with OSH State University

Teaching hospitals are well equipped with modern diagnostic and treatment facilities to train students at a higher scientific and professional level.



OSH CITY

KYRGYZ-RUSSIAN SLAVIC UNIVERSITY...

One of the leading institute in medical education

Founded 1993. Kyrgyz-Russian Slavic University (KRSU) was formed in accordance with the Warsaw Treaty of Friendship and cooperation and mutual assistance between Russian Federation and the Kyrgyz Republic. On 10th July 1992 in Moscow, Russia. Ever seen its establishment, the university has receive good cooperation from its trusted partner, Yeltsin Foundation. Till date. The foundation has been helping the university by providing all kinds of financial support and assistance to accommodate best learning equipment, Infrastructure and Internet access for the students.

By the verdict of the Krygyz Republic President in 2004, the University came to be know by the name of the First President of Russian Federation Nikolayevich Yeltsin to mark the honor and respect of the massive support and encouragement provided in establishing the kyrgyz - Russian Slavic University.

Today, the university aims at imparting best knowledge and education in various humanitarian, legal, nature - oriented and technical subjects. The academy also looks forward to introducing technical facilities, scientific labs and state-of-art infrastructure. Its mission is to help students by providing research facilities, High tech laboratories, computers, department of specific labs and global internet network. At kyrgyz - Russian Slavic University student also get training and organizatitional exposure. They are well groomed on both theoretical and practical aspects. Certain features like the quality of education, excellent amenities and corporate training have made the university stand apart from its competitors.

At present, the university had eight faculties, 80 academic departments. Six research centers. 15 educational and scientific centers. 4 laboratories. 1 medical center, 1 law center and students aesthetic education institute with 1973 academics and research employees and more than 11,000 student of which 480 are from foreign countries and 450 are post graduate and doctoral students. kyrgyz-Russian Slavic University boasts of its industry based educational Environment within its campus.

Bishkek is the capital city of kyrgyz - Republic. formerly know as Pushpek and Frunze. It is the largest city of KR and the administrative center of the Chuy province_Although the city doesn't belong to the province. However it is surrounded by it and is a province lever unit of Kyrgyzstan.

6 YEARS COURSE

BISHKEK CITY

BOY's & GIRL's

HOSTELS



रशियात वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या डॉक्टरांशी आगळा वेगळा संवाद

काही दिवसापूर्वी काही कामानिमित्त एका परिचितांच्या कार्यालयात गेलो होतो तिथे अचानक एका डॉक्टरांशी गाठ पडली आता डॉक्टरांची भेट त्याच्या दवाखाना अथवा रुग्णालया व्यतिरिक्त पडू नये असा काही नियम नाही पण सहसा अशी भेट होत नाही ती झाली. गप्पा मारता मारता समजले की त्यांनी शिक्षण रशियातून पूर्ण केले आहे. हल्ली इंग्लंड अमेरीके व्यतिरिक्त लोक नोकरी, धंदा पर्यटनासाठी जात असले तरी शिक्षणासाठी सहसा अजून रशिया या इतर देशांना पसंती कमी दिली जात असावी असा माझा अंदाज होता. डॉ. दिपेश रसाळांशी बोलतांना माझं ज्ञान बरचसं अद्ययावत झालं अस म्हणायला हरकत नाही, बोलता बोलता असे कळले की आज भारतातून दरवर्षी हजारो मुले -मुली रशियात वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी जातात आणि त्यातील शेकडो विद्यार्थ्यांना स्वतः डॉ. दिपेश रसाळ मदत करुन रशियात पाठवतात ते सुध्दा स्वतःचा नोकरी व्यवसाय सांभाळून केवळ सामाजिक बांधिलकी आणि काम करण्याची तळमळ या भावनेतून हे समजल्यावर साहजिक माझे कुतूहल जागे झाले आणि डॉक्टरांना त्यांच्या या कार्याची माहिती सांगण्याची विनंती केली. अर्थातच त्यांनी ती मनापासून मान्य केली आणि कोणताही आडपडदा न ठेवता त्यांनी माझे कुतुहल शमवले.

डॉ. रसाळ यांच्या रशियातील अनुभव

डॉक्टर दिपेश रसाळ यांनी त्यांचे शिक्षण रशियातून पूर्ण केले, त्यावेळेस रशियात शिकायला जाणारे विद्यार्थी अगदीच नगण्य होते. त्यामुळे तिथे जायचे आणि शिकायचे म्हणजे नक्की काय आणि कसे करायचे याबाबत कुणालाच काही माहिती नव्हती. इकडून तिकडून कानावर आलेल्या गोष्टी, कुठेतरी काहीतरी वाचलेले, त्यातच कुणी आपल्या मनची भर टाकून सांगोवांगीच्या कथा पसरविलेल्या अशा परिस्थितीत, रशियात शिक्षण घ्यायचे ह्या अनिवार उर्मिने आणि काहीतरी वेगळे करायचे ह्या धडपडीतून डॉक्टर रसाळांनी रशियात शिक्षण घेतले, त्यावेळी भाषेची अडचण, चलनाचा प्रश्न, परका मुलूख, वेगळे वातावरण, घरापासून असलेले अंतर, खाणेपिणे वेगळे अशा अनंत अडचणींना डॉक्टर रसाळांना तोंड द्यावे लागले. आज जरी ते तटस्थेतेने त्या कालखंडाकडे पहात असले तरी तो अनुभव नक्कीच त्यांच्या मनाच्या जडणघडणीमध्ये महत्वाची भुमिका बजावून गेला असणार हे नक्की. अशा तावून सुलाखून निघालेल्या कालखंडातून एक नक्की झालं की आपल्याला ज्या त्रासाला सहन करावं लागलं त्या अडचणींना तोंड द्यावं लागलं तशी वेळ आपल्या देश बांधवांवर येऊ नये, तसेच समाजातील सर्व घटकांना वैद्यकीय शिक्षण सुलभतेने घेता यावे ह्यासाठी अशा इच्छुक विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त मदत करायची, त्यांना आवश्यक असलेली माहिती तर पुरवायचीय पण शिक्षण पूर्ण होईपर्यंत एका पालकाच्या भूमिकेतून मदत करावयाची आणि हे सर्व करतांना सामाजिक बांधिलकी, विश्वासार्हता आणि सुरक्षितता या त्रिसूतीची कास सोडायची नाही ह्या निर्धाराने डॉक्टर रसाळांनी सेवाभावी सुंदर एज्युकेशन कन्सल्टंट या नावाने संस्था सुरु केली. स्वतःचा नोकरी व्यवसाय सांभाळून या संस्थचे कार्य डॉक्टर चालवत आहे गेल्या पंधरा वर्षांपासून शेकडो विद्यार्थ्यांचे रशियामध्ये वैद्यकीय शिक्षण घेण्याचे स्वप्न या संस्थेच्या माध्यमातून पूर्ण झाले आहे, हे सांगतांना डॉक्टर रसाळांचा चेहरा अभिमानाने फुललेला होता.

सुंदर एज्युकेशन चे कार्य कसे चालते...

संस्थेचे काम नक्की कसे चालते हे डॉक्टरांनी अगदी विस्तारुन सांगितले. रशियामधील विद्यापीठांमध्ये भारतीय अभ्यासक्रमानुसार इंग्रजीमध्ये वैद्यकीय शिक्षण दिले जाते. सर्वसाधारणपणे असा समज आहे रशियामध्ये रशियन भाषेशिवाय इतर भाषांममध्ये शिकवले जात नाही, परंतु तेथील विद्यापीठांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी काही अडचण येत नाही कारण, भारतात सुध्दा वैद्यकीय शिक्षण इंग्रजी भाषेतूनच दिले जाते. खास भारतीयांसाठी असलेल्या शिक्षणक्रम आणि भाषेमुळे भारतीय विद्यार्थ्यांना शिकायला अडचण येत नाही. अशा विद्यापीठातील प्रवेश प्रक्रियेसंबंधी माहिती देणे, तेथे असलेल्या शिक्षण शुल्क आणि इतर खर्चांसंबंधी खात्रीशीर माहिती देणे आणि त्यांना भेडसावणाऱ्या प्रवेश पूर्व अडचणींचे निराकरण करुन विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची उर्मी प्रदान करणे हा प्राथमिक भाग संस्थेमार्फत सुरुवातीला पूर्ण केला जातो. संस्थेचे काम एवढयावरच थांबत नाही, प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना रशियाला घेऊन जाणे, तेथे त्यांच्या रहाण्याची तसेच खाण्यापिण्याची व्यवस्था लावणे, प्रवेश प्रक्रिया पूर्ण करुन प्रवेश नक्की करणे आणि त्या विद्यार्थ्याच्या रशियातील वैद्यकीय शिक्षणाची सुरुवात करुन देणे ही संपूर्ण जबाबदारी एखाद्या पालकाप्रमाणे संस्थेमार्फत पूर्ण केली जाते याचाच अर्थ असा की पालकांना आपल्या पाल्यांसंबंधी असलेल्या सर्व चिंता दूर करण्याचे काम संस्था मोठया कौशल्याने करते.

रशियन विद्यापीठातील वैद्यकीय शिक्षणाचा कालावधी पाच वर्षाचा असतो. भारतात हाच कालावधी चार वर्षे पाच महिन्यांचा असतो. या व्यतिरिक्त भारतातील शिक्षण आणि रशियातील शिक्षण यात फरक नाही. दोन्ही शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर उपलब्ध संधी दोन्ही शिक्षणक्रमातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी समान असतात त्यामुळे तीन महिने अधिक लागणारा कालावधी वगळता विद्यार्थ्यांनी तेथील विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्याचे प्राधान्य देण्याचे कारण म्हणजे गुणवत्तेनुसार आणि आरक्षण विरहीत प्रवेश प्रक्रिया त्यामुळेच अनेक विद्यार्थी गुणवान असून जात अथवा आर्थिक कारणामुळे भारतात वैद्यकीय शिक्षण घेऊ शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांचा कल रशियात शिकण्यासाठी वाढत आहे असे डॉक्टर रसाळांनी माहिती देता देता सांगितले. संस्थेचे काम प्रवेश करुन दिला म्हणजे संपले का असे विचारले असता डॉक्टर रसाळ हसून म्हणाले, अहो आमचे काम तर तेव्हा सुरु होते शिक्षण घेत असतांना अनेक अडचणी येत असतात कोणत्याही प्रकारची अडचण आली तर सोडवता यावी म्हणून आम्ही तेथील विद्यापीठाच्याच कॅम्पसमध्ये आमचे कार्यालय सुरु केले आहे. रशियासारखा परका मुलुख, घरापासून दूर असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आमचे कार्यालय म्हणजे परेदशातील स्वतःचे घरच आहे असे म्हटले तरी चालेल. डॉक्टर रसाळांनी सांगितले विद्यार्थ्यांचा कोणताही प्रश्न असो, कार्यालयामार्फत तो सोडवला जातो.

सुट्टी विषयी...

जुलै, ऑगस्ट मध्ये दोन महिने सुट्टी असते तेव्हा सर्वजण भारतात आपल्या आपल्या घरी येतात, उरलेले दिवस जरी घरापासून दूर असले तरी त्यांना भारतापासून लांब असल्याचे जाणवत नाही. वेगवेगळे सण उत्सव भारताप्रमाणेच तिथे साजरे केले जातात. अनेक भारतीय आणि मराठी विद्यार्थी एकत्र आल्यामुळे आपण खुप एकटे आहोत असे कुणालाच जाणवत नाही. आनंदाने शिक्षण घेतले जाते. भारतात शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक जाचक अटी, अडथळे पार करण्याची क्षमता नसलेले पण बुध्दीमत्ता आणि इच्छा असलेले अनेक विद्यार्थी रशियातून शिक्षण घेऊन परत भारतात आले आहेत. येथील मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या काही आवश्यक अटींची पूर्तता करुन, विद्यार्थी दशेत पाहिलेले डॉक्टर व्हायचे हे स्वप्न पूर्ण करुन भारतात आपण वैद्यकीय ज्ञानाचा वापर करुन रुग्णसेवेचे बहुमोल कार्य करुन आपला ठसा उमटवत आहेत.

"सुंदर"चे वेगळेपण

डॉक्टर रसाळांनी दिलेली माहिती मी लक्षपूर्वक ऐकते होतो, मध्येच त्यांना थांबवून मी विचारले पण सर हे असे कार्य तर इतर अनेक जण करत आहेत. कित्येक तर पूर्णवेळ व्यवसाय म्हणून करत आहेत. अगदी खरे आहे, स्मित करुन डॉक्टरांनी दुजोरा दिला. मात्र त्यांच्यात आणि आमच्या कार्यशैलीमध्ये फरक आहे. कित्येक व्यक्ती अथवा संस्था ह्या आमच्याप्रमाणेच काम करता. त्यासाठी ते साडेतीन ते पाच लाख रुपये फी आकारतात. विद्यापीठातील फी भारतातच त्यांच्याकडे भरायला सांगतात. कित्येक जण प्रत्यक्षात असलेल्या फी पेक्षा अधिक पैसे घेतात. पुरेशी आणि नेमकी माहिती देत नाहीत. सर्वच क्षेत्रामध्ये असतो तसा फसवणूकीचा प्रकार सुध्दा बोकाळला आहे. मात्र आमची संस्था त्रिसुत्रीला जपणारी आहे. आम्ही केवळ भारतातून विद्यापीठापर्यंत जाण्याचा खर्च घेतो. विद्यापीठाची फी ही विद्यार्थ्यांनी रशियाला गेल्यानंतर तिचे खात्री करुन स्वतः भरायची आहे. आम्ही इथे सांगितलेली फी बरोबर तितकीच आहे ही खात्री आधी करा आणि मग फी तिथे जाऊन प्रवेश प्रक्रिया प्रक्रिया चालू झाल्यावर भरा, असे आम्ही आवर्जून सांगते आणि त्याचप्रमाणे आमच्या संस्थेचे कार्य चालते. त्याअर्थाने आमची संस्था अतिशय रास्त आणि योग्य दरात विद्यार्थ्यांना मदत करते. त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांच्या सोबत असते.

डॉक्टर रसाळांनी सांगितलेली माहिती माझ्यासाठी खुपच वेगळी होती. आजवर नोकरी शिक्षणासाठी मदत करणाऱ्या अनेक संस्था आणि व्यक्तिविषयी ऐकले होते. त्यातील अनेकांच्या सुरस आणि रम्य कथा त्यातील संबंधित व्यक्तींना किती तापदायक ठरलेल्या होत्या हे माहित होते. ह्या पार्श्वभूमीवर डॉक्टर रसाळांच्या संस्थेची कार्यपध्दती वेगळी आणि आशादायक वाटली. याव्यतिरिक्त संस्थेमार्फत काय मदत केली जाते असे विचारले असता डॉक्टर रसाळांनी शिष्यवृत्ती योजनेबद्दल माहिती दिली. गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने संस्थेन शिष्यवृत्ती योजना सुरु केली होती. यानुसार पहिल्या वर्षी प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. असेच दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षासाठी सुध्दा आहे याचा फायदा घेण्यासाठी विद्यार्थी मन लावून अभ्यास करतात आणि चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण होतात.

या संस्थेमार्फत अनेक विद्यार्थी आजवर रशियात गेले आहेत. विशेष म्हणजे केवळ आर्थिकदृष्ट्या स्थिरस्थावर असलेल्या घरातील नव्हे तर कौटूंबिक उत्पन्नाने नाजूक असलेल्या विद्यार्थ्यांनी सुध्दा संस्थेच्या मार्फत आपले स्पप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉक्टर रसाळांनी धुणे भांडे करणाऱ्या महिलेला आलेला अनुभव सांगितला तसेच रेडिमिक्स काँक्रीटची ने आण करणाऱ्या ट्रकवर डायव्हर असलेल्या व्यक्तीची माहिती दिली या व अशा अनेक कुटूंबातील गुणवान मुलामुलींनी डॉक्टर रसाळांच्या मदतीने आपले स्वप्न साकार केले आहे. त्यांची माहिती देतांना डॉक्टर रसाळ किंचित गहीवरुन आले होते. निदान मला तरी तसे वाटले. त्यांच्या कार्याला भरघोस यश मिळावे अशा शुभेच्छा देत मी त्यांचा निरोप घेतला. एक आगळी वेगळी भेट झाल्याचा आनंद मनात होताच, तो या लेखा निमित्ताने शब्दबध्द केला इतकेच.

- सागर विसे,
संपादक, नाशिक

As per the graduate medical education regulations, 1997 of the Medical Council of India, Minimum Qualification for Indian Students.

For processing admission into the Medical Institute and University the following conditions should be fulfilled by the first year applicants.

- He/she should complete the age of 17 years on or before 31st December of the admission to the MBBS course.
- He/she must have passed in 10+12 equivalent examination in the subject of physics, chemistry, biology & English must have to obtain a minimum of 50% marks (Reserve Category 40% marks) required.
- A valid Indian Passport
- Copy of higher secondary school certificate and mark-sheet (12th Science)
- Copy of secondary school certificate nad mark-sheet (10th)
- School Leaving Certificate
- Recent passport coloured 23 copies photographs.
- Parents undertaking
- NEET Eligible Required (Copy of NEET Marksheet)
- If any document declaration submitted by the applicants is found to be false/forged at any stage, his/her admission shall be cancelled and he/she may be liable for prosecution under law.
- Filled application from with D.D. Rs.65,000/- (Non-Refundable) in favour of **"Sunder Educational Consultants"** Payable at Nashik.

Demand Draft (D.D.) has to be paid with admission form for:

- Admission Letter form University
- Visa Fee (Paid to Embassy)
- Air Ticket for Delhi to Respective City
- Transportation by road from Airport to Hostel.
- One Indian meal on arrival & telephone call to parents
- The fee is non-refundable.

UNIVERSITY	COURSE	MEDIUM	FEES (1ST YEAR)	FEES (2ND YEAR TO 5/6TH YEAR)	TOTAL (IN INR)	CURRENT INDIAN STUDENT (APPROX)
KYRGYZ RUSSIAN SLAVIC UNVERSITY	6 Years	English	9400	3200	17,50,000/-	430
SMOLENSK MEDICAL ACADEMY	6 Years	Eng-Rus	7000	7000	29,40,000/-	1248
INTERNATIONAL SCHOOL OF MEDICINE	5 Years	English	7000	5000	19,60,00/-	2416
OSH STATE UNIVERSITY	5 Years	English	8000	3200	14,56,000/-	3760
JASU STATE UNIVERSITY	5 Years	English	7500	3200	13,86,000/-	1680
PERM STATE UNIVERSITY	6 Years	Eng-Rus	5500	5500	23,10,000/-	361
VOLOGARD MEDICAL UNIVERSITY	6 Years	Eng-Rus	6500	6500	27,30000/-	941
TVER STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA	6 Years	English	7000	7000	29,00,000/-	1652
ORENBURG STATE MEDICAL UNIVERSITY	6 Years	Eng-Rus	6000	6000	25,20,000/-	648
SIBERIAN STATE MEDICAL UNIVERSITY	6 Years	Eng-Rus	6000	5000	21,70,000/-	345
KUBAN STATE MEDICAL UNIVERSITY	6 Years	Eng-Rus	4500	3800	16,45,000/-	145
PEOPLE'S FRIENDSHIP UNIVERSITY	6 Years	Eng-Rus	9050	9050	38,01,000/-	16
KURSK STATE MEDICAL UNIVERSITY	6 Years	Eng-Rus	6280	6280	2672600/-	1464
RYAZAN STATE MEDICAL UNIVERSITY	6 Years	English	5500	4000	17,85,000/-	1396
CRIMEA FEDERAL UNIVERSITY, RUSSIA	6 Years	Eng-Rus	6500	4000	18,55,000/-	628
PENZA STATE UNVERSITY	6 Years	Eng-Rus	5000	5000	21,00,000/-	843
FAR EASTERN FEDERAL UNIVERSITY	6 Years	English	5100	5100	21,42,000	761
BUKHARA STATE UNVERSITY, UZBEK	5 YEARS	Eng-Uzb	5000	5000	17,50,000/-	67
ALTAI STATE MEDICAL UNIVERSITY	6 Years	Eng-Rus	4000	4000	16,80,000/-	492

NOTE : • The above information mentioned fee structure is the APPROX amount may be subject to change. The above fees are only Tuition fees (Not include Hostel, Food, Air- Ticket Visa, Admission Processing fees.)

• Mentioned Indian Rupees fees are just for your convenience we considered 1USD = 70 INR Approx.

• This is just to provide information for parents & students.

SUNDER
Educational Consultants

SUNDER EDUCATIONAL CONSULTANTS

Shop No. 10/11, Siddheshwar Apt., Pumping Station, Gangapur Road, Nashik - 422013. Maharashtra, INDIA

Cell : +91 95957 18686, +91 70583 62626 Kyrgyzstan : +996 702 433233

Offices : Aurangabad • Beed • Jalgaon • Solapur • Kolhapur • Thane • Pune • Nanded • New Delhi

DOWNLOAD
E-BROCHURE

www.youtube.com/sunder education consultants

WHATSAPP
CONTACT

The materials and information on this brochure have been prepared or assembled by the Firm and are intended for informational purposes only. The Firm reserves all right to change information, alterations needed if any timely.

#SEC/Jan.2021/0